संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या सदस्यांना/ग्रामस्थांना सवलतीच्या दराने बायोगॅस/ स्वयंपाक गॅस पुरवठा, दुभत्या जनावरांसाठी अनुदान व वृक्ष लागवडीचे संरक्षणासाठी प्रोत्साहन देण्याबाबतची योजना

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : एफडीएम २०१२/प्र.क्र.४/फ-२
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- ०८ ऑगस्ट, २०१२

वाचा :- १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक-एफडीएम-२०११/प्र.क्र.१०० /फ-२, दि.०५.१०.२०११.
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक-एफडीएम-२०११/प्र.क्र.१०४ /फ-२, दि.२५.१०.२०११.
३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक-एफडीएम-२०११/प्र.क्र.१०० /फ-२, दि.२२.१२.२०११.
४) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक-एफडीएम-२०१२/प्र.क्र.४ /फ-२, दि.१०.०७.२०१२.

शासन परिपत्रक :-

संदर्भ क्र.४ वरील दि.१०.०७.२०१२ च्या शासन निर्णयान्वये संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या सदस्यांना/ग्रामस्थांना सवलतीच्या दराने एलपीजी गॅस कनेक्शन देणे, बायोगॅस प्लान्ट पुरवठा करणे, दुभत्या जनावरांसाठी अनुदान देणे व वृक्ष लागवडीच्या संरक्षणाकरिता प्रोत्साहनात्मक अनुदान देणे याबाबतची योजना लागू करण्यात आलेली आहे. या योजनेच्या अनुषंगाने होणारा खर्च अनुसूचित जमाती उपयोजना, अनुसूचित जाती उपयोजना तसेच ७ % वनविकास करामधून भागविण्याबाबत तसेच तेराव्या वित्त आयोगाच्या व कॅम्पाच्या आराखडयामध्ये असलेल्या संयुक्त वनव्यवस्थापन समितीसाठी केलेल्या तरतूदीमधून भागविण्याबाबत सुचना वरील शासन निर्णयान्वये देण्यांत आलेल्या आहेत.

वरील तरतूदीच्या अनुषंगाने वरील शासन निर्णयानुसार निकष पुर्ण करणा-या संयुक्त वन व्यवस्थापन समित्या व त्यांचे सदस्य आणि ग्रामस्थ यांना सूक्ष्म आराखडयानुसार (Micro Plan) ज्या गावात वनीकरणाचे काम चालू आहे त्यांना तेराव्या वित्त आयोगातून व कॅम्पामधून संयुक्त वनव्यवस्थापन कार्यक्रमासाठी उपलब्ध

होणा-या तरतुदीतून या योजनेअंतर्गत उपरोल्लेखित योजना राबविण्याची कार्यवाही प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास)/(कॅम्पा), महाराष्ट्र राज्य, नागपूर तसेच सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रा)/उप वनसंरक्षक(प्रा.)/विभागीय वन अधिकारी/ उप विभागीय वन अधिकारी यांनी करावी. त्यासोबतच संबंधित संयुक्त वन व्यवस्थापन समित्या चराईबंदी, कु-हाडबंदी, अतिक्रमण बंदी करित असल्यास या वर्षी करण्यात आलेल्या सर्व रोपवनांच्या देखभालीकरिता सुपूर्द करण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

(नं.मा.शिलवंत)
उप सचिव,
महाराष्ट्र शासन

प्रति,

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्य जीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ, नागपूर.
प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा महासंचालक, सामाजिक वनीकरण, पुणे.
सर्व अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
सर्व मुख्य वनसंरक्षक/वनसंरक्षक/उप वनसंरक्षक /विभागीय वन अधिकारी/ उप विभागीय वन अधिकारी
आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक
आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य पुणे
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
मा.मंत्री(वने) यांचे खाजगी सचिव.
मा.राज्यमंत्री(वने) यांचे खाजगी सचिव.
सर्व प्रकल्प संचालक, ग्रामीण विकास यंत्रणा.
सर्व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी/ सर्व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण/सर्व प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास विभाग.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १ / २, मुंबई / नागपूर.
महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र १ / २, मुंबई / नागपूर.
संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई.
वन विभागातील सर्व सह सचिव / उप सचिव / अवर सचिव / विशेष कार्य अधिकारी.
निवड नस्ती (कार्यासन फ-२), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

J:\Cab Note New BioGas revised 09042012.doc